१९६२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. १५८४

# गंधखुळी

निर्मला देशपांडे



REFBK-0012713
REFBK-0012713

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
काव्य
३८२६९
२४।९।६३
९५८४

# गं ध खु ळी

अनुक्रम 38269 वि: ...
सांक 9448 नों दि 24-7-80

# गंधखुळी

सौ. निर्मला देशपांडे

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92693
REFBK-0012713
REFBK-0012713

प्रकाशन क्रमांक २५८

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, मुंबअी ४

मूल्य अडीच रुपये

प्रथमावृत्ति : ऑगस्ट १९६२

© १९६२ सौ. निर्मला देशपांडे

प्रकाशक :
विष्णु गजानन परचुरे
ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर
गोरेगांवकर चाळ, क्रमांक २
गिरगांव, मुंबअी ४

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबअी ४

माझे वडील

कै. डॉ. गोविंद माधव फडणीस

यांचे स्मृतीस अर्पण

# अनुक्रमणिका


ओळख प्र. के. अत्रे १

गंधखुळी ५
मी एक चिरंतन थेंबासाठीं झुरतें ७
प्रोफेसर १०
शीव शिंप्या चोळी १२
निरंगा १३
स्पर्श तुझा १४
त्या दिवशीं— १५
जातां जातां १७
आजीचं वय १८
पागोळ्या २०
बेइमान २१
जन्मदिन २२
शिंपली २३
व्यथा २४
एका अमृत क्षणाला २५
छंद २७
डोह २८
याचना २९
छबी ३१

| | |
|---|---|
| आजी | ३१ |
| दीपावलि | ३३ |
| उंबरठ्यावर | ३४ |
| साडी | ३६ |
| तूं | ३७ |
| दान | ३८ |
| जखम | ३९ |
| झोंप | ४० |
| केशराच्या पावलांनी | ४२ |
| कालप्रवाहिनी | ४४ |
| वात जळतच नाही | ४५ |
| किती जपावें | ४६ |
| नको माळ्या | ४७ |
| त्या तसल्या सोनसकाळीं | ४९ |
| पूर्णम् | ५१ |
| घासाघीस | ५३ |
| पुस्तक | ५४ |
| घासाघीस | ५५ |
| हर्पीसांत जातांना | ५६ |
| वीज | ५७ |
| मालविका | ५८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८२६१ वि: ओळख
क्रमांक १५८४ नों दि 24-7-83

# ओळख

लेखक ज्यावेळीं एखादा लेख लिहावयास बसतो तेव्हां आपला विषय निश्चित केल्याशिवाय त्याला लेखणी सरसावतां येणारच नाहीं. पण कवितेच्या बाबतींत असें होत नाहीं. कवितेला विषयाची आवश्यकता अलीकडच्या काळांत फारशी भासेनाशी झाली आहे. मनाची एखादी लहर, एखादी भावच्छटा किंवा एखादाच सौंदर्याचा क्षण, हें अलीकडच्या कवींना पुरेसें होतें. त्या लहरीभोंवतीं, त्या छटेभोंवतीं किंवा त्या क्षणाभोंवतीं ते आपली कविता गुंफतात. कवितेची रचना, तिच्यांतील शब्दयोजना, तिच्यांत व्यक्तवावयाचीं सूक्ष्म भावस्पंदनें ह्यांकडे त्यांचें लक्ष अधिक वेधलेलें असतें. अर्थात् कवितेच्या अनेक चांगल्या जातींपैकीं ही एक अलीकडच्या काळांत विकास पावलेली जात आहे. वाचकांच्या सौंदर्यदृष्टीचें आणि रसिकवृत्तीचें पोषण ह्या जातीची कविता उत्तम प्रकारें करूं शकते ह्यांत कांहींच संशय नाहीं.

सौ. निर्मला देशपांडे ह्यांची कविता याच जातीची म्हटली पाहिजे. स्वतःचें सौंदर्यासक्त मन हेंच कार्यक्षेत्र त्यांच्या कवितेनें निवडलें आहे. स्वतःच्या मनाचे नाजुक तंतू छेडतांछेडतां त्यांतून जे कोमल आणि मधुर स्वर उमटले त्यांना शब्दांकित करण्याची आकांक्षा निर्मलाबाईनीं बाळगलेली आहे. बाहेरच्या जगापेक्षां, त्या जगांतल्या घडामोडींपेक्षां त्यांना आपल्या मनांत चाललेल्या घडामोडी अधिक लक्षणीय वाटल्या. जीवनासंबंधीं कांहीं विचार किंवा आयुष्याचें कांहीं तत्त्वज्ञान सांगण्यापेक्षां आपल्या अंतःकरणांत चाललेल्या भावभावनांचा लपंडाव अधिक वर्णावासा वाटला. आधुनिक कवितेंतले अनेक संस्कार त्यांनीं गोळा केले. विशेषतः आधुनिक कवितेंतली सूक्ष्म सौंदर्यदृष्टि त्यांच्या विशिष्ट

काव्यात्मक मनोवृत्तींना अधिक जवळची वाटली. अशा रीतीनें निर्मलाबाईंची कविता जन्माला आली आहे.

सूक्ष्मसौंदर्यशोधक अशी त्यांची काव्यदृष्टि आहे आणि त्यांच्या भावनात्मक वृत्तींची जातहि अशीच सूक्ष्मतेकडे, कोमलतेकडे झुकणारी आहे. भावनोत्कटतेचे कांहीं लहानसे क्षणच त्यांना पुरेसे वाटतात. भावनांचीं फार मोठीं वादळें त्यांच्या मनाला पेलवत नाहींत. 'मी एक चिरंतन थेंबासाठीं झुरतें' ह्या कवितेंत त्या म्हणतात—

'मज नको नको तो सोसाट्याचा वारा
ती मोडतोड रे ! मला नकोशी होते
मज हवी वाटते गार झुळुक वाऱ्याची
जी माझ्या अधरीं स्मित उधळोनी जाते'

साहजिकच दुःखाच्या तीव्र वेदनेची दाहकता त्यांच्या कवितेंत कधींच अनुभवावयास मिळत नाहीं. एखादी प्रक्षोभक भावना आणि त्या भावनेमुळें उद्भवलेलीं असह्य, अनंत दुःखें त्यांच्या कवितेंतून दर्शन देऊं शकत नाहींत. असें हेलावून, हादरवून टाकण्याचा प्रयत्नहि त्यांनीं आपल्या कवितेंत केलेला नाहीं.

पण भावनेचें पुष्प फुलतांना त्याच्या पाकळ्यांची होणारी थरथर आणि त्या पाकळ्यांतून उधळला जाणारा मधुर गंध मात्र त्यांच्या कवितेंत पुरेपूर हुंगावयास मिळतो. अशा लहान लहान पण मनाला उत्कंठा आणि हुरहुर अनुभवायला लावणाऱ्या सुंदर क्षणांचीं चित्रें त्यांच्या कवितेंतून सुखविल्याखेरीज रहात नाहींत. त्या दृष्टीनें 'त्या तसल्या सोनसकाळीं' आणि 'मालविका' ह्या कविता अत्यंत हृदयंगम आहेत. मालव देशांत क्षिप्रा नदीच्या काठीं उमललेले आपले यौवनाचे दिवस कवयित्रीला आठवतात. त्या गोड आठवणींनीं कवयित्री रोमांचित होते आणि पुन्हा पुन्हा त्या स्मृतिसुभग कालखंडाशीं स्वतःला जोडून टाकण्याचा प्रयत्न करीत राहते.

'त्या तसल्या सोनसकाळीं
मी दंवांत न्हालें होतें
क्षिप्रेच्या कांठावरती
जुळविलें फुलांशीं नातें
मी धुकें लपेटून बसलें
तें ओलें अंग टिपाया
सुटलेल्या केसांवरती
सोन्यानें केली किमया
स्वप्नील लोचनामध्यें
उमटली अधूरी खूण
त्या खट्याळ मालवकन्या
हसल्या ग मला पाहून'

क्षिप्रेच्या तीरावर एका सुंदर सकाळीं कवयित्रीच्या उमलत्या मनोवृत्तींना यौवनसुलभ भावनोत्कटतेचा झालेला साक्षात्कार इथें एका लहानशा प्रसंगांतून पण मोठ्या खुबीनें चितारलेला दिसतो. मुंबई शहरांतल्या गर्दींत आणि गजबजाटांत कवयित्रीला मालवदेशाची काळी माती आठवते आणि ती अचूक शब्दांनीं एक मनोहर चित्र रंगवून जाते.

'त्या इमल्यांच्या काळ्या छाया
नांगरलेली धरती होते.
प्रकाशरेखा—मध्येंच तिरपी
शेवंतीचें फूल उमलतें
शेतांतील त्या मातीसाठीं
तळवे माझे तळमळ करिती
खुणाविते मज मायमाउली

संग्रहालय ठाणे

—मऊ मखमली काळी धरती
माझ्या मनचे मैनाराघू
अधिर बावरे क्षणांत बनती
क्षिप्राकाठीं निंबोणीवर
दोन घडींची होते वसती.'

या कवितासंग्रहांत बऱ्याचशा प्रेमकविताहि आहेत. प्रेमभावनेचें विश्लेषण करण्याच्या, प्रेमविषयाचें चिंतन करतांना चालणारे भावनेचे गूढ खेळ चितारण्याच्या किंवा त्या भावनेंतहि खोल, थेट तळापर्यंत बुडी मारण्याच्या खटपटींत निर्मलाबाई पडत नाहींत. तथापि प्रेमाच्या विचारानें अनुभवास येणाऱ्या धुंदीचे उन्मादक क्षण, कधीं विरहक्षणांतून उद्‌भवणाऱ्या कोमल व्यथा तर कधीं एकटेपणाच्या कल्पनेनें मनाला सुटलेला कंप,—अशाच कांहीं कोमल आणि कातर मनोऽवस्थांचें वर्णन त्यांच्या कवितेंतून येतें. त्या दृष्टीनें त्यांच्या काव्याचें स्वरूप वस्तुनिष्ठच आहे. कारण अशा मानसिक अवस्थांचीं बाह्य वर्णनें त्या निवडक नि सुरेख शब्दांतून करीत जातात. त्यांनीं योजिलेले नादमधुर शब्द आणि त्यांची प्रसादयुक्त रचना त्या ठिकाणीं हृदयाचा वेध घेतल्यावांचून रहात नाहीं. त्या मानसिक अवस्थांच्या बारीकसारीक तपशीलांत त्या पडत नाहींत. मात्र जे कांहीं लहानसे सुंदर क्षण त्यांनीं काव्यासाठीं निवडले आहेत ते चित्रित करतांना त्यांनीं आपल्या काव्यात्मक वृत्ती एकवटून आणि कवितेंत सौंदर्य निर्माण करण्याची निष्ठा बाळगूनच हें काम केलें आहे—त्या कामीं मुळींच कसूर केली नाहीं हें निश्चित.

त्यांची प्रेमकविता ही बहुधा त्या कवितेंतल्या एखाद्या सुंदर कल्पनेवर आधारलेली असते. त्या कल्पनेच्या चमत्कृतींतूनच त्या त्या विशिष्ट कवितेची परिणामकारकता वाढत जाते व त्यामुळें त्या कवितेचा शेवट आल्हादकारक वाटून मन प्रसन्न होतें.

उदाहरणार्थ 'छबी' ही कविता पहा.

'मज न्याहळतां तुझी
छबी गोरीमोरी झाली
जशी भिंतीवरतून
उन्हं उतरलीं खालीं '

—ह्या रमणीय कल्पनेंत शेवट झाल्यानें ह्या कवितेंतलें सौंदर्य वाढलें आहे. 'जातां जातां ' ह्या कवितेंतहि

'आला आला झंजावात
केली विध्वंसाची भाषा
नाहीं पुसल्या परंतु
माझ्या ललाटीच्या रेषा....'

ह्या मध्यवर्ती कल्पनेंतच कवितेंतला हेतु व्यक्त होतो. ह्या कल्पनेंतूनच कवितेला एक वेगाचें आंदोलन मिळतें. 'जखम,' 'याचना,' 'डोह,' 'शिंपली,' ह्या सर्व कवितांतून कल्पनेची मौज अनुभवावयास मिळते.

सुखदुःखांच्या नाजुक उर्मींचें वर्णन करतांना कधींकधीं त्या रूपकाची भाषा वापरतात. ह्या व्याजोक्तीमुळें त्यांच्या कवितेंत अर्थाला अधिकाधिक सूक्ष्मता प्राप्त होते. 'मला आनंद झाला' किंवा 'मला दुःख वाटलें' हें ढोबळ गद्य झालें. पण

'चारा मोतियांचे दाणे
राघू शिवेना–टिपेना
आज पिंजऱ्यांत मैना
कांहीं मंजूळ गाईना !'

हें जातिवंत 'काव्य' झालें. कोमल भावना मार्मिक शब्दांत व्यक्त करण्याच्या त्यांच्या हव्यासामुळें त्यांच्या काव्यार्थाला व्यापकता नि सूक्ष्मता एकाच वेळीं लाभूं शकते. अर्थ जितका अधिक मोठा होतो,

तितकाच तो सूक्ष्महि पण होतो.

अशी ही रूपकांची मर्मस्पर्शी भाषा निर्मलाबाईंच्या कवितेंत अनेक ठिकाणीं आढळते. उदाहरणें द्यायचींच झालीं तर पुढचीं कांहीं उदाहरणें उत्कृष्टपैकीं गणतां येतील.

'अशी कशी जादुगिरी
ऋतु बेईमान झाला—
बाई वसंत बहार
ऐन शिशिरांत आला'

'आज तिचा जन्मदिन
सोळा वर्षांची जाहली
बाई फुलांच्या ओझ्यानं
वेल खालती झुकली'

'एक शिंपली छेदून
खुळ्या! मोती वेचूं नको
शिंपलीचा वेध घ्याया
मोती व्यर्थ ठेचूं नको'

'किती जपावें पाऊल पाऊल
किती मोजकी वाट टिपावी
दिवसाढवळ्या राजसमार्गीं
दुरवरि ऐशी ठेंच बसावी'

'फुलाचेंहि मन जडे
फुलण्याचें पाप घडे'

सौंदर्यासक्ति हा निर्मलाबाईंच्या काव्यात्मक वृत्तींचा पहिला विशेष आहे. रसरूपगंधाचें हें अपार वेड त्यांच्या कवितेंत जागोजागीं अनुभवावयास सांपडतें. 'ओल्या मोगरीचा गंध' त्यांच्या कवितेंतून ठिकठिकाणीं दरवळतांना आढळतो. ह्या सौंदर्यासक्तीमुळें त्यांची कविता ऐश्वर्यसंपन्न भासते. 'साडी', 'तूं', 'केशराच्या पावलांनीं', 'छंद', 'दीपावली', 'गंधखुळी', 'जन्मदिन', 'शिव शिंप्या चोळी', इत्यादि कवितांमधून हें रसरूपगंधास्तव भुलून पडण्याचें खुळेपण प्रत्ययाला येतें.

'मऊ तलमशी साडी
इंद्रधनुष्याची ल्यावी
शुभ्र चोळीसाठीं पिसें
राजहंसाचीं मागावीं'
'लाल रेशमी चोळीला
रुंद करवती काठ,
घाट आगळा दाविते
तुझी चांफेगोरी पाठ'
'राजहंसी मानेवर
मोतियांचा एकसर
दूधकण्या दातांचा कीं
त्याला वाटावा मत्सर'
'हिमगोऱ्या पोटावर
हिर्व्या काचोळीची गांठ
पायापाशी लुडबुडे
पिवळ्या पर्कराचा कांठ'

अशी ही त्यांची फुलांची, वस्त्रांची आणि आभरणांची आवड स्त्रीस्वभावाला साजेशीच आहे. निर्मलाबाईंची कविता ही खऱ्या अर्थानें

स्त्रीची कविता आहे. ती स्वप्नांत रमते. पण व्यवहाराला पारखी होत नाहीं. तिच्यांत वृत्तींचा गंभीरपणा आहे. आणि ह्या गंभीरपणांतून विरंगुळा शोधणारा मिस्कीलपणाहि तिच्यांत पुरेपूर आहे. त्याची साक्ष त्यांच्या विनोदी कविता देतील. 'आजीचें वय', 'शिव शिंप्या चोळी' ह्यांसारख्या कवितांवर स्त्रीगीतांच्या खास मराठी परंपरेचे संस्कार झालेले दृष्टोत्पत्तीला येतात. 'जन्मदिन', 'दीपावली', ह्या कवितांतून मातृसुलभ वात्सल्याचा साक्षात्कार घडतो, तर 'उंबरठ्यावर' ह्या कवितेंत संसाराशीं सर्वस्वानें निगडित झालेली मायाळु गृहिणी आपलें दर्शन घडविते.

त्यांच्या कवितेनें वेगवेगळ्या प्रकारांनीं आणि आकारांनीं भावाविष्करण केलें आहे. तिच्यांत नानाविधपणा आहे आणि निरनिराळीं रूपें धारण करण्याची हौस नि छंद भरपूर आहे. कधीं गंभीर, कधीं विनोदी, कधीं स्वप्नाळु, कधीं व्यवहारी, कधीं शब्दाकृष्ट, कधीं भावनांकित अशा विविध रूपांनीं त्यांची कविता प्रगट झाली आहे. ती लिहितांना त्यांनीं वेचलेले नाजुक, मोजकेच शब्द आणि त्यापेक्षांहि मनोवेधक अशी त्या शब्दांची सौष्ठवपूर्ण रचना, त्यांनीं अधूनमधून योजलेल्या चित्ताकर्षक कल्पना आणि त्या कल्पनेद्वारें व्यक्त केलेलीं कोमल भावस्पंदनें ह्या वैशिष्ट्यांमुळें निर्मलाबाईंची कविता वाचकाच्या मनावर इष्ट परिणाम घडविते आणि उत्तम दर्जाचा काव्यानंद प्राप्त करून देते ह्यांत काय संशय?

शिवशक्ति १ ऑगस्ट १९६२

**प्रल्हाद केशव अत्रे**

# गंधखुळी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 12693
ग्रंथ शाखा (मुळ प्रत)

मावळतीला दिन ढळलेला
क्षितिजशलाका अंधुकलेली
अशा अवेळीं दूर कुठुनशी
उगाच कां रे तार छेडिली

गीत तुझें तें ऐकियलें मीं
सूर–सागरीं बुडविलेंस तूं
मी बुडलें–अन् बुडलें नाहीं
मनांत माझ्या कांहिं न हेतू

आकाशांतिल रंगपंचमी
त्या रंगांतच भिजले डोळे
मनांत माझ्या कांहीं नसतां
आज कशाला भरून आले ?

मिटुनि घेउं का नेत्रदलें अन्
पुसून टाकूं रंगपंचमी
खुळेपणाचें खूळ कसें रे
लपवुनि ठेवूं रंगखुळी मी ?

कसा अचानक सुगंध आला
अंगोपांगीं फुलला मोहर
गंधखुळी मी मनांत माझ्या
बकुल फुलांची हलवी थरथर

त्या गंधानें बावरलें मी
श्वास रोखुनी घेऊं कुठवर?
मनांत माझ्या कांहिंच नाहीं—
—फक्त अनामिक आहे हुरहुर...

## मी एक चिरंतन थेंबासाठीं झुरतें

मीं कधींच नव्हती मागितली दिपवाली
मज नकोच होत्या झगमगणाऱ्या ज्योती
रे ! वांछित होतें अक्षय मिणमिणणारी
मातिची चिमुकली, अल्पमोलशी पणती

मम यौवनसौरभ अमर व्हावयासाठीं
मीं कधींच नाहीं मागितलें वरदान,
शृंगार कराया, वेणिमध्यें गुंफाया—
मज पुरे जाहली एक कळीची खूण

मज नको नको तो सोसाट्याचा वारा
ती मोडतोड रे ! मला नकोशी होते
मज हवी वाटते गार झुळुक वाऱ्याची
जी माझ्या अधरीं स्मित उधळोनी जाते

मज नकोच आहे धो धो धो धो वर्षा
रे ! पुरांत मजला नको लोटुनी देऊं
ते खुळे बहाणे विझण्याचे अन् करुनी
ज्वालेंत स्वतःला नको झोकुनी घेऊं

तें सागरतांडव, रौद्ररूप बिजलीचें
मज लोभसवाणें कधींच गमलें नव्हतें
रे ! चातक-तृष्णा शमवायास्तव माझी
मी एक चिरंतन थेंबासाठीं झुरतें......

# बळ

स्वप्नमंदिराचा
कोसळला थाट
हातीं माती, वीट
घेतली मीं.

मातीच्या घराला
तुळस अंगणीं
दिवली चिमणी
लावीयली

कमळाच्या द्रोणीं
नाहीं मधुपान
ओंजळ भरोन
पाणी प्यालें

सुस्वर संगीत
उमटेना कंठीं
अस्फुटशी ओठीं
ओवी येते...

पापणीचा वर्ख
उडूं उडूं पाहे
माझी सांगताहे
आत्मगीता

ऐसें देगा देवा
ऐरावती बळ
उरीं बिल्बदळ
जपण्यासी...

घड्याळांत ठोके, आठाचे पडती
प्रोफेसर जागे होती, गणिताचे.
अरे जया, माझा ब्रश, कुठें सांपडेना बाळा,
अग ! तूं तरी निर्मला, शोधून देई.
कोणे एके दिवशी, केंस कापावया गेले
गोटा करोनिया आले, परतोनी
पाहोनी हा अवतार, घेतलें मीं तोंडसूख
म्हटलें, "आरशांत श्रीमुख-पहा जरा."

न्हाव्याच्या ग ! हातीं, मीं मस्तक दिधलें
त्याचें त्यानें काय केलें, देव जाणे !
आणि एके दिवशीं, नवल वर्तलें
कपडे धोब्याकडे दिले, स्वहस्तानें.
धोब्याचिये घरीं—नाहीं आनंदाला तोटा
होत्या बत्तिसाच्या नोटा, कोटामध्यें.
पाहोनी ह्या तऱ्हातऱ्हा, अंगाची ग लाही होते
तळव्याची आग जाते मस्तकाला.
तरी मी प्रार्थितें, "सुखी ठेव देवा
प्रेमाचा हा ठेवा, सर्वत्रांचा.
हाचि जोडिदार मजलागी देई,
बाई ! अंबाबाई, जन्मोजन्मीं."

नको माझे आई, देऊं असा शाप
काय केलें पाप, पामरानें.
पुढच्या जन्माची, बात दूर राहो
आज देवा द्या हो, एक वर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 38289 वि: काव्य
क्रमांक 1548 नों दि: 25-9-89

नित्य नाविन्याची, माधुरी आगळी
एक पत्नी झाली—लिहूं नका...

## शीव शिंप्या चोळी

शीव शिंप्या चोळी, किती घालूं येरझारा
सासराला जाते, लाडकी यशोधरा.
शीव शिंप्या चोळी, मोती लाव पसाभर
लाडक्या लेकीसाठीं, चोळी जाते दर्यापार.
शीव शिंप्या चोळी, काढ चंद्र सूर्य दोन्ही
सासरीं चालली रे, यशोधरा बाळ तान्ही.
शीव शिंप्या चोळी, काढ पाठीवर मोर
लाडकी यशोधरा, थोरामोठ्याची रे पोर.
शीव शिंप्या चोळी, लाव करवती काठ
माउलीच्या परी, तिची रुंद आहे पाठ.
शीव शिंप्या चोळी, लाव सोन्याचे घुंगरू
सासरीं चाललं रे! माझं लाडकं वासरूं.
शीव शिंप्या चोळी, लाव पसाभर ऐने
नको पाणी आणूं डोळां, उगी रहा! माझ्या मैने...

## निरंगा

गहन नीलिमा डोळ्यां मधला
सतेज सुंदर शामल कांती—
मराठमोळीं पायतणें अन्
लालखडा नच, नसे अंगठी

पेन मामुली, अल्प मोलसें
कशास तुजला व्हावें पाकिट ?
शुभ्र धवलसा रुमाल हातीं—
कामचलाऊ घड्याळचौकट

रंग निरंगे मिळती–जुळती
मीच होतसे बाष्पबिन्दु अन
तुझ्या मनाच्या विशाल व्योमीं
अशी स्नेहला बसते बिलगुन......

## स्पर्श तुझा

फुलाफुलांच्या रसगंधांतुन
तरळत वाऱ्यासंगे आला
फुलपंखीच्या पंखावरला
चित्ररंगसा तरंग झाला

मेघांच्या अन पटलाआडुन
झुरझुरणारी सुषमा स्नेहल
वीणेचा झंकार सुरेला
स्वप्नखुळा अन कंपित कोमल

डोळ्यांमधले भाव बैसले
बाहुलिच्या तर आडोशाला
ओठांवरले निरर्थ कांही
जपती मूक मण्यांची माला...

चित्राचे संपले चित्रपण
कणाकणाला फुटले अंकुर
स्वरलहरींना सजवुनि गेला
स्पर्श विजेचा...स्पर्श तुझा तर...

# त्या दिवशीं—

त्या दिवशीं दुपारची
दंग होते वाचनांत
अवचित मूर्ति तुझी—
उभी ठाकली दारांत

दचकले बावरले
पदराला सावरले
खुणेसाठी पुस्तकांत
बोट ठेवोनिया दिलें

नीरवाच्या सुरावर
मूक राग आळविले
नकळत पदराचें
टोक गेले चाळवले

तुझी आगळी धिटाई
धारदार डोळाभेट
तुझ्या गूढ सवालांना
जबाबही दिले नीट

काय मी उत्तरले ?
उमजेना माझें मज
तुझ्या सांनिध्यांत केले
पदराशीं हीतगूज—

उंबऱ्यांत तुझे माझे
हात गेले गाठवले
रूप तुझें पाठमोरें
लोचनांत साठवले

तूं गेलास अन झालें
जागी जशी स्वप्नांतून
उजळणी त्या स्वप्नाची
धुंद झालें मनोमन

## जातां जातां

जातां जातां पुसलेस
माझे ओघळले आसूं
त्याच रडवेल्या नेत्रीं
आज ओसंडतें हासूं

अशी माझी फुलबाग
सदा वसंत-बहार
किती करूं केशभूषा !
किती माळावे रे ! हार

आला आला झंजावात
केली विध्वंसाची भाषा
नाही पूसल्या परंतू
माझ्या ललाटींच्या रेषा...

## आजीचं वय

कशी सांगूं जन्मवेळ ?
—होतें आठवे वरीस
तात उतावीळ झाले
लेक लागली गळयास—

आली लगीन घटीका
बाशिंगाचें बळ थोर
झालें सासुरवाशीण
आठ वर्षांची मी पोर !

भाऊजींच्या मुंजीमध्ये
केला मखराचा थाट
भोळ्यासांब शंकराला
सापडली चोरवाट !

आले वन्संना बघाया
कोट पाटलोणवाले
पळी पाणीही जिरेना
माझे कडक डोहाळे !

झालें चांदणी-भोजन
वन्सं ल्याल्या चोरचोळी
थोरली ग ! सई माझी
त्याच रात्रीला जन्मली !

किती वय काय सांगूं ?
सई लेकुर्वाळी झाली
बिजेलाच नातवाची
तिला चाहूल लागली

दाट वृक्षाचा आधार
वेळ फुलली फळली
नका शोधूं पाळंमुळं
विसावा ह्या छायेखाली...

# पागोळ्या

पागोळ्याही पेंगुळल्या
रीमझीम मंदावली
द्वाड खट्याळ वाऱ्याची
चाल जरा थंडावली

निळ्या नभाच्या कुशींत
विसावल्या जलधारा
आता थबकत चाले
वेडा अवखळ वारा

हिर्वा चंदेरीचा शालू
धरा न्हाती-धुती झाली
ओल्या निथळत्या अंगीं
थरकली लाज भोळी

ओली चिंब वसुधरा
होई वेडेंपिसें ऊन
मन अलगद त्याने
डोळे घेतले मिटून...

# बेइमान

अशी कशी जादुगिरी
ऋतु बेइमान झाला
बाई! वसंत बहार
ऐन शिशिरांत आला—

भर दिवसा ढवळ्या
चोर स्वप्नांमध्ये शिरे
खडकांना पालवले
लाख निर्झरांचे झरे

अशी कशी जादुगिरी
वारा बेहोषला धुंद
वाळवंटामध्ये आला
ओल्या मोगरिचा गंध

अशी कशी जादुगिरी
तुझी जीत माझी हार
ऐन ग्रिष्मीं बरसली
गार वळवाची सर...

तुझ्या सोबतीचें आहे
माझ्या डोईवर ऋण
तुला निरोप देतांना
कशी म्हणूं 'बेइमान'?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92893.
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# जन्मदिन

आज तिचा जन्मदीन
सोळा वर्षांची जाहली
वाई फुलांच्या ओझ्यानं
वेल खालती झुकली !

काळे रेशमी कुंतल
बोस मोतियांचे कानीं
जशी घन मेघांआड
लकाकते सौदामिनी

गूढ निळी शीतलता
दोन्ही डोळ्यांत वहाते
अवखळ निर्झरिणी
चंद्रप्रकाशीं नहाते

तुझ्या दर्शनें तूटले
पोरी ! काळाचे निर्बंध
आज मधाच्या कुपीला
आला गुलाबाचा गंध !

## शिंपली

एका एका शब्दांतून
अर्थ दोन शोधूं नको
माझी चाकोरीची रेषा
मागं व्यर्थ रोधूं नको

एका एका कृतीमध्ये
तर्क दोन काढूं नको
एक तुटलेला स्वर
तार व्यर्थ जोडूं नको.

एका धाग्यामध्ये
दोन पीळ पाहूं नको
पिळापिळांतून मला
गुंतवीत राहूं नको.

एक शिंपली छेदून
खुळ्या ! मोती वेचूं नको
शिंपलीचा वेध घ्याया
मोती व्यर्थ ठेचूं नको......

## व्यथा

क्षितिजाच्या काठावर
जमलेला रंगथवा
बघ व्योमीं दीपावलि
आज तिचा साज नवा

भिरभिरला वायु अन्‌
विस्कटला साज नवा
दुर्बल ह्या हृदयाला
कोमलसा शब्द हवा

मिटलेल्या नयनांतुन
विरलेलें स्वप्नधुकें
पदराचा चिंब शेव
गळलेले अश्रु मुके—

## एका अमृत क्षणाला

एका अमृत क्षणाला
युग युग आळविले—
क्षण घेवोनि पातला
घट अमृतभरलें

स्वप्न जागृतीच्यामध्ये
मीच स्वयें हेलावलें
जागेपणीचें हें स्वप्न
मज नाही उमजलें

उभी आरशासमोर
कुंकू भालीं रेखायाला
निथळत्या केसांतून
गंध मोगरिचा आला

विसरलें माझें मीपण
विसरलेही पसारा
काऊ चिऊ अंगाईच्या
विसरले दुग्ध धारा—

मींच मज आर्जविलें
कढ मनिंचे ओताया
हलकेच दिल्या चाव्या
चोर खण खोलावया

अभिमानी मन माझें
उकलतां उकलेना
आनंदाच्या गर्भांतील
कळ कूस बदलेना

क्षण घेवोनि उडाला
दिव्य अमृताचा घट...
...............
...............

माझें मज जाणवलें
सुकतीचें सुकेपण
सुका रेताड किनारा
मुकें आत्मसमर्पण...

# छंद

मी म्हणेन खेळूं सागरगोटे तेव्हां
गगनिच्या तारका याव्या उतरून खालीं–
कानांत हिऱ्याचें आभूषण घालावें–
त्या चंद्रकोरिची दीप्ति खुलावी गालीं

मी म्हणेन नेसूं गर्भरेशमी साडी
तें पोत तलमसें, छटा—फिकी गुल्बाशी
कीं पूर्वदिशेच्या स्वप्न-मंचकावरती
उलगडल्या जाव्या अनंत मोहनराशी

मी म्हणेन माळूं वेणीमध्यें गजरा
जो गंध ओलसर वेड जिवा लावेल
गे! अबोल माझी खूण तयांना पटुनी
खालती झुकावी नक्षत्रांची वेल...

मी लिहीन म्हटलें काव्य एक सुंदरसें
रस-गंध-रुपाचा छंद मना जडलेला
तों पिठा-मिठाचा तपशिल उतरे खाली
अन् गतजन्मींचा हिशेब चुकता झाला

# डोह

आज प्राजक्तीचें फूल
कांहीं फूलता फुलेना
त्याचा कोंदटला श्वास
जरा खुलतां खुलेना

काळ्यासावळ्या कृष्णाचा
पावा घुमता घुमेना
स्मृति कुंजांत राधिका
आज रमतां रमेना...

चारा-मोतियांचे दाणे
राघू शिवेना-टिपेना
आज पिंजऱ्यांत मैना
कांही मंजूळ गाईना

वरी हेलावलें जळ
लाट जराही चळेना
तळ गाठला परंतु
थांग डोहाचा लागेना......

## याचना

चहुंकडे पसरली
गर्द काळोखाची छाया
परतली घराकडे
मूक पाखरांची माया

कुरकुरे तिन्हीसांज
जीव कावराबावरा
बाई! कातरवेळेस
मन कापे थरथरा

त्याच तसल्याच वेळीं
कुठे तरी अवचीत
कधी तरी व्हावी वाटे
तुझी माझी डोळाभेट

मोगऱ्याच्या दाटीमध्ये
लाल गुलाबाला ताठा
बंद केले चोरखण
आव आणतोस मोठा

कधी कधी मज व्हावा
त्याच गुलाबाचा भास
अवचित कुठे तरी
ओझरता दिसावास...

## छबी

जाऊं नये तेथे आज
आज वाटलें जावेंसें
उंबराचें फूल आज
डोळाभर पहावेंसें—

नदीपल्याडून आली
गार वाऱ्याची लहर
सावरला गेला तुझा
गर्भरेशमी पदर—

मज न्याहळतां तुझी
छबी गोरीमोरी झाली
जशी भिंतीवरतून
उन्हं उतरलीं खाली

# आजी

किती दिवसांनी आज
आली तुझी आठवण
तुझ्या सन्नीध फुललें
माझें भोळें बालपण

गारव्याला वाटाचा ग
तुझ्या गोधडीचा हेवा
तुझ्या कुशीमध्ये लाभे
साऱ्या ब्रम्हांडाचा ठेवा...

लोणी साखर जाणिते
तळहाताचें गुपीत
त्याची मृदुमधुरता
माझ्या मनाच्या कुपींत

तुझ्या देवपूजेसाठी
वेल प्राजक्ताचा लक्ष
तुला पूजण्यास आजी!
तुझ्या स्मरणांची साक्ष

तुझ्या जीवनाचा दीप
उजळलें घरदार
जळे कापराची ज्योत
उरे सुगंधाचा धूर

किती दिवसांनी माझी
मोहरली मनोवेल

तुझ्या दुबळ्या कायेला
लाभे निर्माल्याचें मोल

आजी तुझी सय येते
आज राहून राहून
गडे! तुझ्या संगें गेलें
माझें शैशव वाहून...

अनुक्रम ३४२८१ वि:
क्रमांक ९५८४ नों दि: २४

गूढ टपोर डोळ्यांना, काळी काजळाची कड
वाळं पाचांपेडी वेणी, गुंते रेशमाची लड

रुंद तांबूस कानांत, डुलतात चंद्रकोरी
कुठे लपवावे तुला, दृष्ट लागेलग ! पोरी

राजहंसी मानेवर, मोतियांचा एकसर
दूधकण्या दातांचा की, त्याला वाटावा मत्सर !

गाल मऊ मुलायम, गुलाबाच्या फुलापरी
नाक तोकडें जरासें, माशी बसेचना वरी

हीमगोऱ्या पोटावर, हिर्व्या काचोळीची गांठ
पायापाशी लडबुडे, पिवळ्या पर्कराचा कांठ

चांदणीची सतेजता, हरीणीची चपळाई,
सुषमेची स्नेहलता, एकरूप तुझ्याठायीं

आली दीपावली आली, बारामासीं एक सण
माझ्या संसारांत बाई ! दीपावली रात्रंदीन

ह्या पुरे यातना सहन होईना बोजे
मज माझें झालें जीवन अवघें ओझें
मन जीवन्मृत्युच्या रेषेवर डगमगतें
तें अडेल मोठें ऐलतिरीं घुटमळतें

तो पिवळा चांफा जाइजुई अन् मरवा
तो रंग उडवितो अंगांगावर हिरवा
ती धवल केशरी प्राजक्तीची शेज
खुणविते मला ती ऐन पहाटे रोज
त्या शेजेवरती कां ग वृथा तगमगते?
मन स्वप्निल माझें कुठे तरी घुटमळतें

ती पितळी, घागर, तीच दुधाची चरवी
प्राशून दुग्ध ती दिमाखांत की मिरवी
त्या चरवीसंगें फुलतो माझा ऊर
त्या तेजा पुढती सुवर्ण लाजुन चूर
मन माझें तिचिया कांठावर डचमचळतें
तें छटेल मोठें तिथेच गे घुटमळतें.

त्या कोरिव सुंदर शिसवी देव्हाऱ्यांत
श्रीकृष्ण सख्याची मूर्ती इवली शांत
चिरप्रकाशदायी पिवळी दीपज्योत
ती "शुभं करोती"—चिमणे गोंडस हात
त्या ज्योती भंवती वृथाच गिरक्या घेतें
मन खळ्याळ कुठलें तिथुन हलूं ना बघतें

त्या पाळण्यांतल्या दोन मुठी तांबूस
तालावर धरती रुणझुणत्या वाळ्यास
हुंगीत बसावें जावळ काळें भोर
अन् गोंजारावे रंगित चिमण्या मोर
हें सोडुनि जाया हृदय सखे पिळवटतें
मन अवखळ मोठें पाळण्यांत खुळखुळतें

अन् विशालशा त्या सुंदर भालावरुनी
ही काया सखये टाकिन कुरवंडोनी
श्वासांत जयाच्या दर्वळतो निशिगंध
ते गहिरे डोळे, नजर जराशी धुंद
त्या नजरेमध्ये मीच पुरी अडखळतें
मम जीवन अवघें तिथेच गे! घुटमळतें...

# साडी

मऊ तलमशी साडी
इंद्र धनुष्याची ल्यावी
शुभ्र चोळीसाठी पिसें
राजहंसीची मागावी

रिते मदिरेचे प्याले
दंव बिन्दुंचे करावे
माझ्यांतच विरावें मीं
धुंदीतच धुंद व्हावे

चिर क्षुधा शांतीस्तव
गोड तुझी स्मृती उरे
कमळाच्या कोषांतला
एक मधु-कण पुरे

# तूं

लाल रेशमी चोळीला, रुंद करवती कांठ
घाट आगळा दाविते, तुझी चांफेगोरी पाठ

भाळ सुढाळ सुरेख, वरी कुंकवाचा टिळा
आंबाड्यांत मोगरिचा, हार गुंफूनिया दिला

लोचनांच्या शिंपल्यांत, निळया मोतियांचें पाणी
करी अचेता सचेत, तुझी अमृताची वाणी

गोऱ्यापान गळ्यावर, एकसर काळी पोत
सर्व मंगल मंगल, गडे ! विसावले तेथ.

साडी रेशमी झाकीते, बांधा गोरटा उभार
मृदु कमल-टाचांना, पायतणें काळीं शार

साठवलें लोचनांत, तुझें गोजिरें रूपडें
जातां जातां शिंपिलेस, मंद सुगंधाचे सडे...

## दान

कणाकणानें कसें जळावें
पेटावें, पेटवून द्यावें
धुमसत रहावें, परि न विझावें
दान मागतें अग्नीपाशी...

असें वहावें, तसें वहावें
वहात जावें, तरत रहावें
बुडवावें अन् स्वतः बुडावें
दान मागते पाण्यापाशी...

मेघांना फोडावें झोडावें
क्षणभर लख्कन चमकुनि जावें
काड काड मग धरणीवरती—
स्वयें स्वतःला झोकुनि द्यावें
दान मागतें बिजलीपाशीं......

## ज़ख़्म

अंधुकसा स्वप्नथवा
पदचिन्हें पुसलेलीं
व्रण अजुनी भरताहे
जखम जरा सुकलेली

तीं स्वप्नें, तीं स्मरणें
त्या शपथा, वचनें तीं
आठवतें अन् करतें
जखम पुन्हा भळभळती...

## झेंप

नको वेणीमध्ये
मोतियांची जाळी
मेघमाला निळी
भाळीं गुंफूं

नको होतें हातीं
सोन्याचें कंकण
बांधावें तोरण
आकाशाला

काचोळीचे बंद
नको होते उरीं
आणूं हिमगिरी
उखडोनी

नकोच लोळाया
रेशमाची शेज
कुशीमध्ये वीज
घ्यावी वाटे

खुळ्या भावनेला
नको होते पंख
वेदनेला डंख
नको होता

नको करू मन।
अशी बंडखोरी
फिर भिरीभिरी
वरट्यांत...

## केशराच्या पावलांनी

माझ्या ग अंगणांत–हळदीकुंकवाचा सडा
सनईच्या संगतींत–वाजे वाजंत्रीं-चौघडा

गुढ्या तोरणांच्या संगें–फडकती पताका
सप्तरंगीं इंद्रधनु–तनमनावर देखा

आज बाई अंगण हें–झालें सुवासाने धुंद
वेडा वसंत पवन–उधळतो निशिगंध

उभा तिथे अंगणांत–माड कावराबावरा
त्याच्या शेजारीं प्राजक्ती–व्यर्थ कापे थराथरा

आज बाई अंगणांत–वर्षा गुलाबजलाची
शांत झाली तगमग–लयलूट सिंचनाची

आज माझें अंगण ग–सुवासिनींनी फुललें
सुगंधीत सौख्यपुष्प–मनोमनांत खुललें

या ग बाई सुवासिनी तुम्ही देवीरूप या या
माझ्या राजहंसालागीं शुभ आशिर्वाद द्याया

यावें तुम्ही साऱ्या जणी ओवा मंगळसूत्राला
दीर्घायुष्य चिंता बाई माझ्या लाडक्या पुत्राला

आली मंगल घटिका सखयांनो त्वरा करा
सुवासिनीहातीं चूडा मळवट ओटया भरा.

आज गडे चहुंकडे तेजाळले लक्ष दीप
घन तिमिराचे झाले कणकण पुलकीत

कुणी तरी उंबऱ्यांत धान्यमाप ठेवा बाई
केशराच्या पावलांनी गृहलक्ष्मी घरायेई

घराच्या ग स्वामिनीला, शुभ्र पायघड्या घाला
शुभ्रपण गालीं हसे, लाजऱ्या त्या पावलाला !

# कालप्रवाहिनी

कालप्रवाहिनी नदी    अशी तुडुंब वहाते
खळाळत्या लाटांवर    गोड संगीत झरतें

पूर्वदिशा तिला घाली लाल गुलाबाची झूल
देते केसांत खोवून    सोनकमळाचे फूल

मावळती मायावेडी    लावी काजळाचें बोट
इडा पिडा टळो बाई    नको व्हावयाला दृष्ट

तिच्या आकाशी साडीचा रंग अजून विटेना
काळया चंदेरी चोळीचा कांठ अजून फाटेना

तिच्या मोकळया केसांचा गंधवाही वाही गंध
कालप्रवाहिनी वेडी चाले नादांतच धुंद

श्वसनांत वसनांत    पुष्पदलें उमललीं
कालप्रवाहिनी त्यांना  गात अंगाई बैसली

मुलायम अंगकान्ती    मृदु मख्मली समान
कोवळीक साकारली   हिर्व्या तृणपर्णातून...

चिरयौवना अशी ही रोज नव्याने जन्मते
जीवनाचें–चैतन्याचें  गूढ उकलून जाते...

## वात जळतच नाही

वाट पहात असतां      हरपली तहान भूक
ओवी ओवतां ओवतां  शब्द शब्द झाले मूक

वाट पहावी पहावी      प्राण डोळ्यांत आणून
जन्मोजन्मी आठवावी  दिल्या वचनांची खूण

वाट पहातांना माझें      रंध्ररंध्र झाले कान
लय तुझिया चालीची  शहारलें पान पान

वाट पाहून पाहून      माझे पेंगूळले डोळे
सांवळेसें मूख झालें,    गोरेंमोरें रडवेलें

वाट पहात असतां      दिन ढळला ढळला
काजळल्या दिशा दाही, टळे सुवर्णाची वेळा

थकलेली वाट भासे,    मृत नागिणीच जणू
डोळ्यांमधल्या विजेला, गारगोट्या कशी म्हणूं ?

झाली सचेतन वाट,    जुने दुवे जोडूं पाही
अंधारली रात्र तरी,    वात जळतच नाही

वात जळतच नाही,    तेल सरलें सरलें
फिर फिर रे! माघारी, माझी मीच न उरलें...

# किती जपावें

किती जपावें पाऊल पाऊल
किती मोजकी वाट टिपावी
दिवसा ढवळ्या राजसमार्गी
दुखरी ऐशी ठेंच बसावी

किती करावी राखणदारी ?
दो नयनांचीं सताड दारें—
मध्यरात्रिची भूलभुलावण
झपाटतें हें तनमन सारें

तोल सावरूं—तोल सावरूं
नकळत जाइल झोक म्हणोनी
अथांगशा ह्या डोहामध्ये
खोल बुडवितें दाहक पाणी

घोळ रेशमी खोवुनि घेते
स्पर्शुन जाइल अग्निशलाका
आवरायचें आवरतें तरि
ज्वालेनें मज लपेटलें का ?

सावरतांना आवरतांना
डुबते, बुडते, जळते, मीही
सांगायाचें सांगिन म्हणते
शब्द परंतु फुटतच नाहीं

नको माळ्या

नको माळ्या नको माळ्या
खुडूं नको मुक्या कळ्या
मुक्या कळ्या, पोरीबाळी
अजून ना लाज भालीं
अजून ना स्मित गालीं
रीत यांची साधीभोळी

गंधवाही वाऱ्या वाऱ्या
फुलव रे कळ्या साऱ्या
होईल रे कळी फूल
करूं नको दिशाभूल

संभ्रमास भ्रमर हा
गुंजारव करी पहा
फूल जरा गालीं हसे
भ्रमराला लागे पिसें

भ्रमर तो वेडापिसा
फुलालागीं म्हणे कसा?
" ये ना जरा खेळीमेळी
अळीमिळी गूपचिळी"

फुलाचेंही मन जडे
फुलण्याचें पाप घडे
असा खेळ रंगलेला
घाट पुरा भंगलेला

धरणीला फूल गळे
फुलण्याचें दुःख सले
येरे वाऱ्या गंध वाही
फुलांत ह्या अर्थ नाही

अवघ्याची ब्रह्मांडाला
पाचोळ्याचा भार झाला
माळ्या ये रे वाऱ्या ये रे
झाडून जा रान सारें
झाडून जा रान सारें...

## त्या तसल्या सोनसकाळीं—

त्या तसल्या सोनसकाळीं,
मी दवांत न्हालें होतें
क्षिप्रेच्या कांठावरती
जुळविलें फुलांशीं नातें

मी धुकें लपेटुन बसलें
तें ओलें अंग टिपाया
सुटलेल्या केसांवरती
सोन्याने केली किमया

स्वप्नील लोचनांमध्ये
उमटली अधूरी खूण
त्या खट्याळ मालव-कन्या
हसल्या ग ! मला पाहून

थरथरत्या पाण्यावरती
चढला ग ! रुपेरी वर्ख
अलिगुंजन ऐकित असतां
सोशिले मधाचे डंख

अन् गुलाल उधळित आली
ती मादक सोनसकाळ
कां कुणास ठावे माझे
लज्जान्वित झाले गाल

ती तसली सोनसकाळ
राहिली आजला दूर
ग ! अवती भवती माझ्या
दाटला तमाचा पूर

निःशब्द जाहला आज
हा शामल सागर कांठ
ह्या अंतिम जललहरीही
ओढिती मला दर्यांत—

आज ह्या सांजवेळेला
घट बुडतो बुडतो डोहीं
अन् स्वयें हरवुनि बसतें
घन तिमिरामध्ये मीही...

## पूर्णम्

अख्खा विडा खावा खावा
त्याची रंगतच न्यारी
अर्धी लवंग वेचव
एक ठसक्याची भारी

कॉफी निम्मी निम्मी नको
कप तुला बशी तुला
पुरा घोट प्याल्यावर
देई बशी अन् पेला

एक खट्टी मिठी गोळी
कशी वाटूं रे दोघांत
गेले पडोन कधीच
माझे चिमणीचे दांत

दोन्ही गाल हवेत का ?
(एका वेळीं) एक बरा
जरा चूक झाल्यावरी
पुढे करीन दूसरा

मज कांही न उमजे
'अर्ध-आवृत नी मस्त'
सोनियाच्या पिंजऱ्यांत
झालें पुरी मी बंदिस्त !

92693

संसाराच्या गणिताचें
नको काव्यात्म उत्तर
कुठे फुलांचे निश्वास ?
सारे कांटे नि फत्तर...

# घासाघीस

आहे भाग्य विशाल तें म्हणुनिया संसारदक्षा अशी
लाभे पत्नी तुम्हां मदीय गुण तें वर्णूं तरी मी कशी ?

वस्तूंचे दर आणते सहज मी निम्म्याहुनी खालती—
"तूं ना ? तूं चतुरा खरी तुजपुढे कुंठीत होते मती !

संसारा रुचि आगळी तुजमुळें उम्मीद वाटे मना—
घासाघीस करून रेल तिकिटें स्वस्त्यांत घेशील ना ?

# पुस्तक

“ठेवा पुस्तक बाजुला नि सखया सन्नीव माझ्या बसा
द्या गुंफून हातांत हात, उडतो हा काळपक्षी जसा”

“व्हावें पुस्तक आजला परतण्या ग्रंथालयीं जाउनी
बदलाया तुजसी न जाइन कुठे चिंता कशाला मनीं ?”

## घासाघीस

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे ...
अनुक्रम 38269 वि: ...
... 9548 ... दि: 24-9-...

भाजीवाल्या भैय्यासंगें
नको करूं घासाघीस
तुझी संसारदक्षता
माझा जीव कासावीस

रस्त्यामध्ये मैत्रिणींशीं
नको तासन् तास बोलूं
नको माझा भोळा जीव
मोहकाव्यावर तोलूं

कापडाच्या दुकानांत
इन्द्रधनुष्याच्या राशीं
तुझ्या लोचनीं चांदणें
व्यथा सांगूं मी कुणाशीं?

## हपीसांत जातांना

हा घ्या हातरुमाल, शर्ट चढवा अंगामध्ये सत्वर
हे मोजे पकडा, पहा लटकला तो कोट खुंटीवर
कामें एकटि मी करूं किती ? तुम्हां येई न माझी दया
"तें सारेंच खरें परंतु तुजला 'टेबीयली' कासया ?"

## वीज

दारावरचा पडदा निळसर
सारुन जेव्हा पाहिलेंस तूं
पुरता कळला आकाशाला
चित्तचोर बिजलीचा हेतू

× × ×

दूर दर्वळे हिरवा चाफा
कां झालिस गे मंत्रविद्धशी
स्निग्ध धवलशा प्राजक्तीच्या
अंगणांत तव पडल्या राशी !

× × ×

सागरही स्थिर व्हावा
ओठंगाव्या मेघराशी
तुझा निरोप सांगाया
चंद्र थांबावा उशाशीं

× × ×

अरे आकाशाच्या बापा
नसे तुझें भय मला
दोही कर जोडितें मी
धरित्रीच्या मानवाला—

## मालविका

उंच उंच ह्या इमल्या आडुन
पहाटवेळा कशी दिसावी ?
आकाशांतिल रंगपंचमी
चित्रांतच कीं चित्रित व्हावी.

उंचावुन अन् मान जराशी
तुडुंब अपुल्या भरल्या नयनीं
मी ही वेंधळी शोषुन घेते
मावळतीची शुक्र चांदणी—

त्या इमल्यांच्या काळ्या छाया
नांगरलेली धरती होते
प्रकाशरेखा–मधेच तिरपी
शेवंतीचें फूल उमलतें—

शेतांतिल त्या मातीसाठीं
तळवे माझे तळमळ करिती
खुणावितें मज मायमाऊली
—मऊ मखमली काळी धरती

माझ्या मनचे मैनाराघू
अधिर बावरे क्षणांत बनती
क्षिप्राकांठीं निंबोणीवर
दोन घडींची होते वसती.

हळवा शीतल मालव वारा
गुणगुण करतो हळूंच कानीं
"अजून माझी सय येते कां?
—अजून झरतें काजळ—पाणी?"

अशा जागत्या झोपेमध्ये,
मोहन धागे गुंफित असतां—
अंबाड्यावर शेवंतीचें
फूल खोवितो जातां जातां—

REFBK-0012713
REFBK-0012713
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 12693
शाखा